# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:06.11.2025** **वारः गुरुवार**

---

बिहारमध्ये पहिल्या टप्प्यातल्या मतदानाला सकाळी सुरुवात

भारताच्या जलक्षेत्र सर्वेक्षणाची क्षमता वाढवणारे इक्षक जहाज नौदलात दाखल होणार

वंदेमातरम् गीताच्या सार्धशतीनिमित्ताने वर्षभराच्या स्मृतीदिन कार्यक्रमाचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्या उद्घाटन

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांच्या आयातशुल्कासंबंधीच्या निर्णयावर अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली शंका आणि

भारत- ऑस्ट्रेलिया पुरूष संघांदरम्यान वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील आज चौथा सामना

**<u>बिहारविधानसभा</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाला आज सात वाजता सुरुवात झाली. त्यामध्ये १ जिल्ह्यातील १२१ मतदारसंघामध्ये मतदान होणार आहे. यामध्ये बिहारची राजधानी पाटणा, वैशाली, नालंदा, भोजपूर, मुंगेर, सारण, सिवान, बेगुसराय, लखीसराय, गोपाळगंज, मुझफ्फरपूर, दरभंगा, मधेपुरा आणि सहरसा यांचा समावेश आहे. सुरक्षेच्या कारणास्तव सिमरी बख्तियारपूर, महिषी, तारापूर, मुंगेर, जमालपूर आणि सूर्यगढ विधानसभा मतदारसंघातील ५६ मतदान केंद्रांवर संध्याकाळी पाच वाजेपर्यंतच मतदान होणार आहेत. मतदान शांत, मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात पार पडण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. सर्व ४५ हजार ३४१ मतदान केंद्रांवरून वेबकास्टिंग केले जाईल. पाटणा इथल्या निवडणूक कार्यालयामध्ये एक विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांनी उत्साहाने मतदान करावं असं आवाहन केलं असून, पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या युवा मतदाराचं अभिनंदन केलं आहे.

**<u>इक्षकनौदल</u>**

भारतीय नौदलाच्या जलक्षेत्र सर्वेक्षणाची क्षमता वृद्धिंगत करणारे इक्षक जहाज आज औपचारिकरित्या नौदलाच्या सेवेत दाखल होणार आहे. नौदल प्रमुख अँडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत हा समारंभ होणार आहे. इक्षक या वेसल वर्गातील तिसऱ्या आणि दक्षिण नौदल कमांड तैनात असलेल्या पहिल्या जहाजामुळं सर्वेक्षण क्षमता वाढणार आहे. देशाच्या जहाज बांधणी क्षेत्रातल्या वाढत्या स्वावलंबनाचं एक

खणखणीत उदाहरण आहे. जहाज, बंदरे आणि जलमार्ग पूर्ण प्रमाणात किनारपट्टी आणि खोल पाण्यातील जलक्षेत्र सर्वेक्षणासाठी जहाजाची निर्मिती केली आहे.

**वंदेमातरम्**

वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सव म्हणजेच सार्धशतीनिमित्ताने देशात वर्षभर साजऱ्या होणाऱ्या वर्षभराच्या स्मृतीदिनाचं उद्‌घाटन उद्या दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं याचं आयोजन करण्यात येणार असून, स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आणि राष्ट्रीय अभिमान, एकता जागृत करणाऱ्या या कालातीत गीताची दीडशेवी वर्षपूर्ती साजरी होणार आहे. या निमित्ताने स्मरण तिकीट आणि नाण्याचे प्रकाशन होणार आहे.

**पंप्र-अमूल**

भारतातल्या आघाडीच्या सहकारी संस्था अमूल आणि इफको यांनी जागतिक सहकार क्रमवारीत अनुक्रमे पहिलं आणि दुसरं स्थान मिळवलं आहे. पंतप्रधानांनी या दोन्ही संस्थाचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधानांनी, समाज माध्यमांवरील आपल्या संदेशात, देशांतर्गत सहकार क्षेत्र उत्साहाने काम करत असून, अनेकांच्या आयुष्यात परिवर्तन घडवत आहे. भविष्यात या क्षेत्राला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी सरकार अनेक पावले उचलत असल्याचंही त्यांनी संदेशात नमूद केलं आहे.

**गवई**

प्रशासन, न्यायपालिका आणि कायदेमंडळ या लोकशाहीच्या तीनही अंगाचे अस्तित्व लोककल्याणासाठी अस्तित्वात असून, एकाकीपणे ते कार्यरत राहू शकत नसल्याचं प्रतिपादन देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल मुंबईत केलं. मुंबईत महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या नव्या परिसराचं उद्‌घाटन न्यायमूर्ती गवई यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. न्यायिक संरचना बळकट करण्यासाठी राज्य सरकार उचलत असलेल्या सक्रीय पावलांचे न्यायाधीशांनी कौतुक केलं. या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. राज्यात तीन राष्ट्रीय विधी विद्यापीठं स्थापन करण्यात सरन्यायाधीशांनी महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले. गोरेगावच्या या विद्यापीठाची ख्याती आंतरराष्ट्रीय विद्यापीठ म्हणून होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**ट्रम्प**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापारी तूट कमी करण्यासाठी आणि उत्पादन वृद्धीच्या प्रयत्नात १९७७ च्या आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याचा वापर करून १००हून अधिक देशांमधून होणाऱ्या आयातीवर एकतर्फी आयातशुल्क आकारले होते की नाही याविषयी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी साशंकता व्यक्त केली आहे. गेल्या काही वर्षांतील सर्वात महत्त्वाच्या आर्थिक खटल्यांपैकी एक असणारे हे प्रकरण आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या अधिकारात हा निर्णय घेतला की कर आकारणीच्या कॉंग्रेसच्या अधिकाराचे उल्लंघन केले हे या खटल्यातून स्पष्ट होणार आहे. मुख्य न्यायाधीश जॉन रॉबर्ट आणि न्यायाधीश एमी बॅरेट, नील गोरसच यांनी सरकारने लागू केलेल्या शुल्काच्या औचित्यावर

संशय व्यक्त केला आहे. अनेक लहान व्यवसाय आणि राज्यांच्या समूहाने या शुल्काला बेकायदेशीर म्हणून आव्हान दिले आहे.

**अमेरिका**

अमेरिकेत, केंटकीमधील लुईसव्हिली आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण घेत असताना एक मालवाहू विमान कोसळून नऊजण ठार झाले. गव्हर्नर अँडी बेशियर यांनी आणीबाणीची स्थिती जाहीर केली. सोळाजण बेपत्ता असल्याची तक्रार त्यांच्या कुटुंबियांनी केल्यामुळं मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. शकते. ११ जण जखमी झाले आहेत, त्यापैकी अनेकांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. अंदाजे ३८,००० गॅलन इंधन वाहून नेणारे यूपीएस विमान उड्डाणादरम्यान अनेक इमारतींवर आदळलं, त्यामुळं मोठी आग लागली आणि स्फोट झाला.

**हाश्मी**

अमेरिकेत, भारतीय वंशाच्या गझाला हाश्मी यांनी व्हर्जिनिया लेफ्टनंट गव्हर्नरपदाची निवडणूक जिंकून इतिहास रचला आहे. या पदावर विराजमान होणाऱ्या त्या पहिल्या दक्षिण आशियाई अमेरिकन आणि पहिल्या भारतीय वंशाच्या महिला ठरल्या आहेत. ६१ वर्षीय डेमोक्रॅटिक हाश्मी यांनी व्हर्जिनिया राज्य सिनेटर म्हणून इतिहास रचल्यानंतर सहा वर्षांनी रिपब्लिकन जॉन रीड यांचा पराभव केला. १९६४ मध्ये हैदराबादमध्ये जन्मलेल्या गझाला हाश्मी लहान वयातच अमेरिकेत गेल्या होत्या, त्यांचे वडिल विद्यापीठात अध्यापक होते.

**ममदानी**

न्यू यॉर्क शहरातील महापौरपदाच्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार जोहरान ममदानी यांनी विजय मिळवला आहे. त्यांनी अपक्ष उमेदवार अँड्र्यू कुओमो यांचा पराभव केला. या विजयामुळे, ममदानी हे न्यू यॉर्क शहरातील पहिले मुस्लिम आणि आजवरचे सर्वात तरुण महापौर बनले आहेत. ममदानी हे अमेरिकेचे आणि युगांडाचेही नागरिक आहेत. नामवंत चित्रपट निर्मात्या मीरा नायर यांचे ते चिरंजीव आहेत. दरम्यान, राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमांवरील संदेशात, ममदानी यांना "कम्युनिस्ट उमेदवार" म्हणून दोषी ठरवले होते. ते निवडून आले तर न्यू यॉर्क शहरासाठी संघीय निधी कमी केला जाऊ शकतो असा इशारा त्यांनी दिला होता.

**देवदिवाळी**

कार्तिक पौर्णिमेनिमित्त, उत्तर प्रदेशात वाराणसीत काल गंगानदीचे ८४ घाट लक्ष लक्ष दिव्यांनी उजळले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी नमो घाटावर पहिला दिवा लावून उत्सवाची सुरुवात केली. दशाश्वमेघ घाटावर ऑपरेशन सिंदूरवर आधारित दीपोत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातही देवदिवाळी पारंपरिक पद्धतीनं उत्साहात साजरी करण्यात आली. कोल्हापुरात करवीरनिवासिनी महालक्ष्मी मंदिर परिसर, पंचगंगेचा घाट हजारो पणत्यांनी उजळला होता. रायगड किल्ल्यावरही दीपोत्सव साजरा झाला. तर पुण्यात श्रीमंत दगडूशेठ गणपतीला ५२१ पदार्थांचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. तसंच ओंकारेश्वर मंदीर, पातळेश्वर लेणी, पर्वती तसंच शहरातील विविध मंदिरांमध्येही दीपोत्सव साजरा करण्यात आला.

**<u>फिलीपिन्सवादळ</u>**

फिलिपीनमध्ये आलेल्या कालमेगी वादळामुळे बळी पडलेल्यांची संख्या ९०वर पोचला आहे तर अनेक लोक बेघर झाले आहेत. देशातल्या मध्यवर्ती सेबू बेटावरील शहरं पाण्याखाली गेली असून, ४९ जणांच्या मृत्युची नोंद झाली आहे तर ७५ लोक बेपत्ता झाले असून, १७ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये मिंडानाओ बेटावरील मदतकार्यांदरम्यान कोसळलेल्या लष्करी हेलिकॉप्टरमधील सहा कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

**<u>महिलासंघपीएम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्याच्या निवासस्थानी विश्वविजेत्या महिला संघाची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. सलग तीन पराभवानंतर स्पर्धेत मुसंडी मारत विश्वविजेतेपदाला गवसणी घातलेल्या संघाचे कौतुक केले. यावेळी २०१७मध्ये करंडकाविना पंतप्रधानाशी भेट झाल्याची आठवण कर्णधार हरमनप्रीतने करुन दिली तर पंतप्रधानांकडून प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळाल्याचे उपकर्णधार स्मृती मंदानाने यावेळी नमूद केले.

**<u>इजिप्तनेमबाजी</u>**

इजिप्तमध्ये आजपासून सुरू होणाऱ्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत मनू भाकरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सामील होणार आहे.  पिस्तुल प्रकारात मनू भाकर, ईशा सिंग आणि सुरूची सिंग देशाचं प्रतिनिधित्व करतील.  रायफल नेमबाजीत, रुद्रांक्ष पाटील, स्वप्नील कुसळे सहभागी होतील, अनुभवी नेमबाज एलाव्हेनिल वलारिवन, सिफ्ट कौर समरा, अर्जुन बाबुता, अनिश भानवाला आणि ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर यांचाही भारतीय चमूत सहभाग आहे. स्पर्धेत ७२ देशांतील ७२० नेमबाज सहभागी होतील.

**<u>फिडेबुद्धिबळ</u>**

बुद्धिबळामध्ये फिडे विश्वकरंडक स्पर्धेत, भारताच्या अव्वल खेळाडूंनी दमदार कामगिरी केली आहे. ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश, अर्जून इरिगाईसी आणि पेंटला हरिक्रिष्णा यांनी स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. दीप्तियन घोषने जागतिक विजेता इयान नेपोमनियाला पराभूत करत आश्चर्याचा धक्का दिला. डी. गुकेशने कझाकस्तानच्या खेळाडूचा १.५-०.५ असा तर अर्जुनने बल्गेरियाच्या प्रतिस्पर्ध्याचा २-० असा पराभव केला.

**<u>पुरूषक्रिकेट</u>**

ऑस्ट्रेलियामध्ये भारत- ऑस्ट्रेलिया पुरूष संघांदरम्यान सुरू असलेल्या वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना आज होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी पावणेदोन वाजता सामना सुरू होईल. दोन्ही संघांनी प्रत्येकी एका सामन्यात विजय मिळवल्यानं मालिकेत १-१ अशी बरोबरी केली आहे.

**<u>हिमाचसहवामान</u>**

हवामानातील बदलामुळे हिमाचल प्रदेशात बर्फवृष्टीला सुरुवात झाली आहे. किन्नौरमधील चिटकल या पर्यटनस्थळी दोन इंच बर्फवृष्टी झाल्याची नोंद झाली आहे. यामुळे हिमाचल प्रदेशातील सफरचंद उत्पादकांना दिलासा मिळाला आहे. पुढील दोन दिवसांत चंबा, कांगडा, कुल्लू, किन्नौर आणि लाहौल-स्पिती जिल्ह्यांच्या उंच भागात हलका बर्फवृष्टी होण्याची शक्यता असल्याचं सिमल्याच्या हवामान केंद्राच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**